# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.12.2025** **वारःबुधवार**

1. तुकडेबंदी कायद्यातल्या जाचक अटी शिथिल करणाऱ्या विधेयकाला विधानसभेची मंजुरी
2. वंदे मातरमच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त राज्यसभेत; तर निवडणूक सुधारणांवर लोकसभेत चर्चा
3. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांच्या पार्थिव देहावर पुण्यात शासकीयइतमामात अंत्यसंस्कार आणि
4. दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेत भारताची विजयी सलामी

**विधी मंडळ कामकाज**

तुकडेबंदी कायद्यातल्या जाचक अटी शिथिल करणारं विधेयक काल विधानसभेत मंजूर झालं. यामुळं सर्व जमीनधारकांची नावं सातबाऱ्यावर येतील आणि लहान भूखंडाची खरेदीविक्री सुलभ होईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

या नवीन विधेयकामुळे आता विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा मंजूर असलेल्या क्षेत्रात वेगळ्या 'एनए' परवानगीची गरज भासणार नाही. त्याऐवजी 'एकवेळचे अधिमूल्य' भरून ही प्रक्रिया पूर्ण करता येईल, असं या विधेयकात स्पष्ट करण्यात आलं आहे.

गुटका बंदीसाठी कायद्यात आवश्यक दुरुस्ती करुन हा कायदा अधिक कठोर केला जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत सांगितलं.

बिबट्यांच्या प्रश्नासंदर्भात लोकप्रतिनिधी तसंच वन आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन सर्व प्रश्न सोडवले जातील असं वन मंत्री गणेश नाईक यांनी याबाबतच्या लक्षवेधीला उत्तर देताना सांगितलं.

भटक्या कुत्र्यांसदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना देण्यात आल्या असून त्याची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरु असल्याची माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली. मुंबई महापालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांसंदर्भातील लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना त्या बोलत होत्या.

भीक मागण्यास प्रतिबंध करणारं विधेयक आणि ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, पंचायतसमिती सुधारणा विधेयक विधान परिषदेत मंजूर झालं.

नगरपरिषद, नगरपंचायती, औद्योगिकनगरी सुधारणा विधेयकालाही विधानपरिषदेनं मंजुरी दिली.

राज्यातल्या महिला आणि बालसुधार गृहांमधली सुरक्षा रक्षकांची रिक्त पदं महिनाभरात भरण्याचं आश्वासन महिला आणि बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी विधान परिषदेत दिलं. जलसंधारण प्रकल्पांमधील अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणांच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

**संसद**

वंदे मातरम या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त काल राज्यसभेत विशेष चर्चा झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या चर्चेला प्रारंभ केला. स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी महत्त्वपूर्ण ठरलेलं वंदे मातरम गीत 2047 मध्ये विकसित भारत झाल्यानंतरही तेवढंच महत्त्वाचं असेल असं प्रतिपादन शहा यांनी यावेळी केलं. स्वातंत्र्यलढ्यात काँग्रेसनं वंदे मातरम हेच ध्येय आणि घोषणा बनवली, असं प्रतिपादन राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी या चर्चेदरम्यान केलं.

लोकसभेत काल निवडणूक सुधारणांवर चर्चा झाली. निवडणूक यंत्रणेत सुधारणा करणं फार सोपं आहे, पण सरकारला ते करायचं नाही, असा आरोप लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या चर्चेदरम्यान केला. निवडणूक आयोगाच्या संरचनेत सत्ताधारी पक्षाचा हस्तक्षेप

असल्याचा आरोप त्यांनी केला. खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेस खासदार मनीष तिवारी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचेखासदार अनिल देसाई,कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल, शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनीही या चर्चेत भाग घेतला.

**झेब्रु शुभंकर**

रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने 'झेब्रु' शुभंकराचं अनावरण हे परिवहन विभागाचं महत्त्वाचं पाऊल आहे. या शुभंकरामुळे रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम अधिक प्रभावी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. परिवहन विभागाच्या वतीनं झेब्रु शुभंकराचं अनावरण काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळून रस्ता सुरक्षा मोहिमेत सहभाग घ्यावा. 'रस्ता सुरक्षा जीवन रक्षा' हा मूलमंत्र अंगीकारावा, असं आवाहनही फडणवीस यांनी यावेळी केलं. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसंच अन्य मंत्री आणि अधिकारी उपस्थित होते.

**सायकल स्पर्धा**

पुण्यात जानेवारी महिन्यात पुणे ग्रँड टूर आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेसाठी पुणे शहरातल्या 45 किलोमीटर रस्त्यांच्या नूतनीकरणाचं काम प्रगतीपथावर आहे. या बाबत  पुणे महापालिकेतील शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी आकाशवाणीला माहिती दिली. ते म्हणाले....

या दरम्यान एकूण चारशे सदतीस किलोमीटरची सायकल स्पर्धा होणार आहे चार टप्प्यामध्ये पंचावन्न किलोमीटर आणि वीस किलोमीटर असं मिळून पंच्याहत्तर किलोमीटर ही पुणे शहरामध्ये होणार आहे आणि त्यासाठी पुणे महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणात तयारी केलेली आहे. या संपूर्ण मार्गावर जिथे जिथे डांबरी करणं आवश्यक आहे कारण की सायकलिंग स्पर्धेसाठी काही नॉर्म्स असतात की रस्त्याचा रगनेस इंडेक्स किती पाहिजे तर त्या अनुषंगाने अनेक ठिकाणी आपल्याला डांबरी, काम करायला लागत आहेत येत्या काही दिवसांमध्ये ही कामं सगळी संपतील. पुणे खड्डेमुक्त करण्याचा एक अभियान हाती घेतलं होतं ते अभियान चालूच आहे परंतु मागच्या एक महिन्यामध्ये आपण मोठ्या प्रमाणात खड्डे आणि रिसर्फेसिंग केल्यामुळे शहरातला रस्त्यांचा दर्जा चांगला झालेला आहे आणि परिणामस्वरूप इथला सुद्धा वाहतुकीचा वेग वाढणार आहे आणि वेग वाढल्यामुळे वाहतुकीची समस्या सुद्धा थोड्याफार प्रमाणात इज आउट व्हायला आपल्याला मदत होणार आहे.

**पुस्तक वाचन**

पुणे पुस्तक महोत्सवाअंतर्गत आयोजित शांतता पुणेकर वाचत आहेत या उपक्रमात काल पुणेकरांनी मोठ्या संख्येनं उत्स्फूर्त सहभाग घेतला. सकाळी 11 ते दुपारी 12 या तासाभरात 70 हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी पुस्तक वाचन करून आपलं छायाचित्र संकेतस्थळावर पाठवलं. या वाचन उत्सवात 17 ते 22 वयोगटातील युवकांची संख्या सर्वाधिक होती आणि पुरुषांपेक्षा महिलांची संख्या काही हजारांनी अधिक होती. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि अन्य काही मंत्र्यांनीही या उपक्रमात सहभागी होऊन पुस्तक वाचलं. फुले मंडईतील विक्रेतेही या उपक्रमात सहभागी झाले होते. शहरातली शाळा महाविद्यालयं, गृहनिर्माण सोसायट्या, रेल्वेस्थानक, मेट्रो स्टेशन, सार्वजनिक वाचनालय, ग्रंथालय, रिक्षा थांबे, महापालिकेची कार्यालयं, सामाजिक संस्थेची कार्यालयं, खासगी आस्थापना अशा सर्वच ठिकाणी सकाळी 11 ते 12 या वेळेत आपल्या आवडीचं पुस्तक वाचून नागरिकांनी या उपक्रमाला पाठिंबा दर्शवला.

**डिजिटल डीटॉक्स**

10 डिसेंबर हा दिवस जागतिक डिजिटल डीटॉक्स दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त काल पुण्यात तीनशे शालेय विद्यार्थ्यांनी मोबाईलचा कमीत कमी वापर करण्याची शपथ घेतली.

**सवाई गंधर्व**

अभिजात शास्त्रीय संगीतातील स्वरपंढरी मानल्या जाणाऱ्या जागतिक दर्जाच्या पुण्यातील 71 व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाला आजपासून सुरुवात होत आहे . हा महोत्सव येत्या 14 तारखेपर्यंत 5 सत्रात रंगणार असून निम्म्याहून  अधिक कलाकार प्रथमच आपली कला सादर करणार आहेत. दुपारी 3 वाजता लोकेश आनंद यांच्या सनई वादनाने या स्वरयज्ञाची सुरुवात होणार आहे .

**अंत्यसंस्कार आढाव**

ज्येष्ठ समाजसेवक डॉक्टर बाबा आढाव यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शासनाच्या वतीनं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करुन श्रद्धांजली वाहिली. डॉ. बाबा आढाव यांनी खऱ्या अर्थानं कष्टकरी, श्रमिक, गरीब, वंचित आदी वर्गाकरता संपूर्ण आयुष्य समर्पित केलं असं पवार यावेळी म्हणाले.

तत्पूर्वी, मार्केट यार्डमधील हमाल भवनात बाबा आढाव यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. बाजारपेठेशी निगडीत हमाल, तोलार, मापाडी यांनी आपल्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली.

डॉ. बाबा आढाव यांच्या कार्यात गेली अनेक वर्ष साथ देणारे सामाजिक कार्यकर्ते नितीन पवार आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले...

बाबांनी हमास, रिक्षाचालक, कातपत वेचक, मूलकर्णी, शेतमजूर, बांधकाम कामगार अशा वेवेगळ्या घटकांसाठी काम केलं. त्यांनी सामाजिक सोषेचा विषय ऐरणीवर आणला. एक पत सर्वांना मिळावी यासाठी बाबा आढाव यांनी जे कार्य केलंय. ते आता त्यांचे सहकारी म्हणून त्याची जबाबदारी आमच्यावर आलेली आहे. सामुदायिक पुरुषार्थ हा बाबांचा आवडता शब्द होता. त्याचा वापर करून आणि सत्याग्रहाच्या मार्गाने या विषयांचा या प्रश्नांचा आग्रह धरून आम्ही नक्की ही लढाई पुढे नेऊ असा मला विश्वास वाटतो.

**<u>क्रिकेट</u>**

टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतील कटकमध्ये झालेल्या पहिल्या सामन्यात,भारतानं काल दक्षिण आफ्रिकेला 101 धावांनी पराभूत केलं. विजयासाठी 176 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ केवळ 74 धावांमध्ये गारद झाला. हार्दिक पांड्या 28 चेंडूत 59 धावा करून सामनावीर ठरला. अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी 2 गडी बाद केले.
भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा सामना येत्या गुरुवारी चंदीगड इथं खेळला जाणार आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात थंडीचा जोर पुन्हा वाढत आहे. येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.